# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 20/12/2022 (मंगळवार) सकाळ

## दुखापत

**पो.स्टे. कुही** :— अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौजा हळदगाव येथे दिनांक १९/१२/२०२२ चे १८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सुरज रामरावजी छापेकर, वय ३२ वर्ष, रा. हळदगाव यांनी आपली मोटरसायकल नेहमी प्रमाणे घराजवळील नातेवाईक आरोपी नामे— विलास छापेकर, रा. हळदगाव यांच्या घराचे समोर लावली असता यातील आरोपीने फिर्यादीला ''तु आमच्या घरासमोर तुझी मोटरसायकल लावायची नाही'' म्हणुन फिर्यादीशी वाद करून शिवीगाळी करून लाकडी काठीने डोक्यावर मारून फिर्यादीस जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. ७२० चांगदेव कुथे पोस्टे. कुही मो. नं. ९७६४००७७२० हे करीत आहे.

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. उमरेड** :— दिनांक १८/१२/२०२२ चे ११.३० वा. ते १२.३० वा. दरम्यान यातील फियादी ही १८/१२/२०२२ संध्याकाळी ०७.०० वा. शेतातुन घरी आल्यावर फिर्यादीचा मुलगा नामे— ओमकार वरखडे याने फिर्यादीला म्हटले कि ''मी तुला सांगितले तर झगडा होईल, त्या पेक्षा तु पिडीता हिलाच काय झाले ते विचार'' असे म्हणुन तो घरा बाहेर निघुन गेला. त्यावरून फिर्यादीने तिची मुलगी पिडीता वय १२ वर्ष हिला काय झाले असे विचारले असता तिने सांगितले की, पिडीता ही नमुद घटनावेळी घरा बाहेर खेळत होती तेव्हा पिडीता हिची मैत्रिण नामे—प्राची ही पिडीता जवळ आली व तिने सांगितले की, आरोपी नामे— नितेश हिरामन गेडाम, वय ३५ वर्ष, रा. नाड शिवनफड ता. भिवापुर याने तिला २ रू. देवुन पिडीता हिला नितेशच्या घराकडे जाण्यास सांगितले. त्यावरून पिडीता हिने प्राचीला आरोपी नितेशला काय काम आहे असे म्हटल्यावर प्राचीने तिला काही माहित नसल्याचे सांगितले. त्यावरून पिडीता हिने आरोपी नितेशच्या घरी जावुन काय काम आहे असे म्हटले तेव्हा आरोपी नितेश हा पिडीता हिचा हात पकडुन घरात नेत होता पिडीता तेथुन जाण्याचा प्रयत्न करू लागली परंतु आरोपीने पिडीता हिला त्याच्या घरात घेवुन गेला आरोपी नितेश याने पिडीता हिची मैत्रिण प्राचीला ५ रू देवुन घराच्या बाहेर काढुन दार टेकावले पिडीता हिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ भादंवी. सहकलम ०८, १२ बाल लैगिंक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक शितल खोब्रागडे पोस्टे उमरेड मो. नं. ८३०८०८२०९४ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**